तरुण भारत संवाद

सोमवार, ३० जून २०२५

# अकरावीचे प्रत्यक्ष प्रवेश आजपासून

प्रतिनिधी

कोल्हापूर

अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची गुणवत्ता यादी शनिवारी जाहीर झाली. पहिल्या प्रवेश फेरीत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी आज (दि. ३०) पासून सुरू होणार आहे. कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेत पहिल्या फेरीतील प्रवेश ३० जून ते ७ जुलैपर्यंत विद्यार्थ्यांनी पूर्ण करावयाचे आहेत. दुसरी प्रवेश यादी ९ जुलै रोजी जाहीर होणार आहे.

अकरावी प्रवेशाची गुणवत्ता यादी

■ ३० जून ते ७ जुलैपर्यंत पहिल्या फेरीतील प्रवेश

शनिवारी जाहीर झाली. शाखानिहाय कटऑफ वेगवेगळा जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये विज्ञान विभागासाठी राजाराम कॉलेज ९१.८०, विवेकानंद कॉलेज ९१.८०, न्यू कॉलेज ९१.६० तर एस. एम. लोहिया हायस्कूलचा ९१ टक्के कटऑफ आहे. वाणिज्य शाखा इंग्रजीसाठी कॉमर्स कॉलेजचा ९२.४० टक्के, विवेकानंद कॉलेजचा ८६.४० तर डी. डी. शिंदे हायस्कूल ८५.६० टक्के कटऑफ आहे. वाणिज्य मराठीसाठी कॉमर्स कॉलेज ७८ टक्के, न्यू कॉलेज ७६.८० टक्के कट ऑफ आहे. कला शाखेसाठी न्यू कॉलेज ७६.२० टक्के, राजाराम कॉलेज ७१.८० टक्के इतका कटऑफ आहे. तरी विद्यार्थ्यांनी मिळालेल्या कॉलेजमध्ये जावून प्रवेश घ्यावा, असे आवाहन शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

तरुण भारत सोमवार, ३० जून २०२५

# रोजगार मेळाव्यातून २९० जणांची नियुक्ती

**कोल्हापूर :** शहरातील स्वामी विवेकानंद संस्थेच्या सभागृहात शुक्रवारी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा झाला. ६३६ उमेदवारांनी यावेळी सहभाग नोंदवला. पात्रतेनुसार ३६० मुलाखती झाल्या त्यापैकी प्राथमिक निवड २४७ तर अंतिम निवड ४३ जणांची झाली. मुख्यमंत्री प्रशासकीय गतिमानता अभियानांतर्गत जिल्हा कौशल्य विकास विभाग व विवेकानंद संस्थेच्या संयुक्तकडून रोजगार मेळावा करण्यात आले होते.

मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सुरू योजनेतून तरुणांना सहा हजार, आठ हजार, दहा हजार असा स्टायफंड देण्यात येतो. अशी माहिती पालकमंत्री आबिटकर यांनी उद्घाटनाप्रसंगी केले.

स्वामी विवेकानंद संस्थेचे अभयकुमार साळुंखे, जमीर करीम, उमेश देशमुख, गोकुळ एमआयडीसीचे अध्यक्ष स्वरूप कदम, सीईओ कौस्तुभ गावडे आदी, उपस्थित होते.